ठाणे जिल्हा परिषदा व त्याअतंर्गत ०५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच अन्य जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोट निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम -२०१७

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक:-रानिआ/जिपपस/२०१७/प्र.क्र.४९/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०४/१०/२०१७

प्रति,
जिल्हाधिकारी,
ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे,
नाशिक, नंदुरबार, लातूर,
अकोला, यवतमाळ व वाशिम

विषय :- ठाणे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ०५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका व अन्य जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणूकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम -२०१७

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाची क्र.रानिआ/जिपपंस/२०१७/प्र.क्र.४७/का.७, दिनांक ११/०८/२०१७ व दि. २१/०९/२०१७ ची पत्रे
२) राज्य निवडणूक आयोगाची क्रमांक-.रानिआ/नप-२०१७/प्र.क्र.१३/का.६, दिनांक २५/०९/२०१७ ची अधिसूचना.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधिन अ.क्र.१ समोरील दि. ११/०८/२०१७ व दि.२१/०९/२०१७ च्या पत्रान्वये ठाणे जिल्हा व त्याअंतर्गत ०५ पंचायत समित्यांच्या निवडणूकीसाठी प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला असून दि.०४/१०/२०१७ पर्यंत अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या निवडणूका शक्य तितक्या लवकर घेणे आवश्यक आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादीच

वापरण्यात येते. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत व संभाव्य मतदानाचा दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार करण्यासाठी एक विशिष्ट दिनांक (Cut off Date) अधिसूचित केला जातो. (जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चा कलम १३)

३. या निवडणूकांची मतदार यादी तयार करण्यासाठी दिनांक ०३.१०.२०१७ हा दिनांक (Cut off Date) जाहीर केला असून त्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१, कलम १३ मधील तरतुदीनुसार आयोगाने संदर्भांकित अ.क्र.२ समोरील क्र.रानिआ/नप-२०१७/ प्र.क्र.१३/का.६, दि. २५.०९.२०१७ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. (प्रत संलग्न)

४. भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०३/१०/२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे जिल्हा परिषदेसाठी निवडणूक विभागनिहाय व पंचायत समित्यांसाठी निर्वाचक गणनिहाय विभाजन करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

५. मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती - दिनांक ०३/१०/२०१७ हा अर्हता दिनांकावर प्रसिध्द झालेली विधानसभेची मतदार यादी ठाणे जिल्हा परिषद व त्यातंर्गत ०५ पंचायत समित्यांची निवडणूक व अन्य जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

६. वरील मतदार यादी ग्राहय धरुन ठाणे जिल्हा परिषद व त्यातंर्गत ०५ पंचायत समित्यांची निवडणूक (परिशिष्ट-२) तसेच अन्य जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील अनुक्रमे परिशिष्ट ३ व ४ मध्ये नमूद निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या पोटनिवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट १ प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : दिनांक १०/१०/२०१७ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : दिनांक १७/१०/२०१७ |
| (iii) | प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : दिनांक ३१.१०.२०१७ |

(७) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-

७.१ जिल्हाधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे पुढील बाबींचा विचार करुन प्रभागनिहाय विभाजन करावे :-

| | | |
|---|---|---|
| अ) | मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून आवश्यक विधानसभा मतदार यादीची सॉफ्ट कॉपी प्राप्त करुन घेणेकामी जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विधानसभा मतदार संघ क्रमांक व नाव, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसचे मतदार यादी तयार करण्यासाठी नेमण्यात आलेले कर्मचारी यांचे नांव, पदनाम, भ्रमणध्वनी क्र. व ई-मेल आयडी, इ. बाबतची माहिती पाठविणे. | दिनांक ०४/१०/२०१७ |
| ब) | युजर आयडी व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर Election Assembly Master, Ward Master अ. अपलोड करणे, तयार करण्यात आलेला Control Chart आयोगाकडील संगणकीकरण कक्षाकडून योग्य असल्याची खात्री करुन घेणे व त्यानंतर तयार करण्यात आलेल्या मतदार यादीची पीडीएफ तयार करणे. | दिनांक ०६/१०/२०१७ |

७.२ प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी :-

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेत समाविष्ट असलेल्या एकुण मतदारांची संख्या आणि जिल्हा परिषद / पंचायत समित्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे. (म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्व मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.)

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.०६/का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

क) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्यांमधील दुरुस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

७.३ महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

८. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार / नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दिनांक १०/१०/२०१७ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

९. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-

९.१ दिनांक १०/१०/२०१७ ते दिनांक १७/१०/२०१७ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांनुसार फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल :-

(i) लेखनिकांच्या काही चुका
(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले
(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, जिल्हा परिषद / पंचायत समितींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

९.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

१०. अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना दिनांक ३१/१०/२०१७ रोजी मुद्दा क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

११. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील सूचना फलक
(ब) स्थानिक वृत्तपत्र
(क) स्थानिक केबल टि.व्ही.
(ड) जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयातील संकेत स्थळ, इत्यादी

१२. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची राहील.

१३. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाच्या संगणकीकरण शाखेकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास खालील नमूद दुरध्वनी किंवा ई-मेलद्वारे संपर्क साधण्यात यावा.

दुरध्वनी क्रमांक -०२२-२२८८६९५०, email- sec.mh@gov.in

१४. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, अमरावती, औरंगाबाद
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक, नंदुरबार, लातूर, अकोला, वाशिम व यवतमाळ
६. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
७. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.४९/का.७, दि.०४ /१०/२०१७

## परिशिष्ट-१

**ठाणे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ०५ पंचायत समित्यांच्या निवडणूका तसेच अन्य जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील पदांच्या पोट निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक | दि. ०३/१०/२०१७ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील निवडणूक/पोटनिवडणुकीकरिता तयार केलेली मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. १०/१०/२०१७ |
| ३ | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. १७/१०/२०१७ |
| ४ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १३ खाली अधिप्रमाणित करण्याची तारीख | दि. ३१/१०/२०१७ |
| ५ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या छापील मतदार याद्या माहितीसाठी ठेवण्यात आल्या आहेत, याबाबतची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | दि. ३१/१०/२०१७ |

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

H:\Thane ZPPS & Bye Election २०१७ Voter list Prog.docx

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.४९/का.७, दि. ०४ /१०/२०१७

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ठाणे | १) शहापूर<br>२) मुरबाड<br>३) कल्याण<br>४) भिवंडी<br>५) अंबरनाथ |

## परिशिष्ट-३

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणुक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | पुणे | हवेली | ३५-देहू-लोहगाव |
| २ | वाशिम | मालेगाव | २८-पांगरी नवघरे |

## परिशिष्ट-४

| अ.क्र. | जिल्हा | पंचायत समितीचे नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | रायगड | उरण | ५६-चाणजे |
| २ | सिंधुदुर्ग | दोडामार्ग | १००-माटणे |
| ३ | नाशिक | नांदगाव | ७७-पानेवाडी |
| ४ | नंदूरबार | नंदूरबार | ९०-कोठली खु. |
| ५ | लातूर | औसा | ९७-किल्लारी |
| ६ | अकोला | मलकापूर | ६३-मलकापूर-१ |
| ७ | यवतमाळ | मारेगाव | १८-मार्डी |

(नि. ज. वागळे)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

H:\Thane ZPPS & Bye Election २०१७ Voter list Prog.docx

RNI No. MAHBIL /2009/31748
Regd. No. MCS/174/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक ४८] सोमवार, सप्टेंबर २५, २०१७/आश्विन ३, शके १९३९ [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ सप्टेंबर २०१७.

**आदेश**

क्रमांक रानिआ/नप-२०१७/प्र.क्र. १३/का-६.—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ रोजी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, या अधिनियमांतर्गत असलेल्या नगरपरिषदा/नगर पंचायतींच्या, जिल्हा परिषदा व पंचायत समितींच्या माहे डिसेंबर, २०१७ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**शेखर चन्ने,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.